# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

१०३८ जा.क्र.रासनिप्रा/क वर्ग/सह.सं/आदेश /२०१४
दि०१/१२/२०१४

**वाचावे :**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ३ (i) व (v), नियम ७५
२.इकडील जा.क्र.रासनिप्रा/जिसनिअ/अधिकारप्रदान/सन २०१४ दि.२०/१०/१४
३.इकडील जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/सन २०१४ दि.१०/१०/२०१४

**विषय** : महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील 'क' वर्गातील संस्थाचे निवडणुक कामी सहकारी खात्या व्यतिरिक्त शासनाचे इतर विभाग, सहकारी संस्थांचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी/ अधिकारी यांची निवडणुक कामकाजासाठी नेमणुक करणेबाबत.

**<u>प्रास्ताविक</u> :-**

ज्या अर्थी , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी कलम ७३ कब नुसार शासन अधिसुचना सीएसएल २०१४/ प्र.क१२४/१५- सी दि.३०/३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठीत केले आहे. आणि,

ज्या अर्थी , महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, दि.१२/९/२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रामध्ये दिनांक ११/९/२०१४ रोजीची महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ ची शासन अधिसुचना अधिसुचित होऊन त्या दिवसापासुन हे निवडणुक नियम अमलात आलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये सहकारी संस्थांचे 'अ', 'ब', 'क' व 'ड' असे प्रकार करण्यात आलेले असुन नियम ७५ मध्ये 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी घ्यावयाच्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, राज्यातील सहकारी संस्थांच्या समितीच्या निवडणुका ह्या विविध कारणामुळे होऊ न शकल्यामुळे सद्यस्थितीत 'क' वर्गातील बहुतांशी सहकारी संस्थांच्या निवडणुका घ्यावयाच्या असुन त्यातुलनेत सहकार विभागातील उपलब्ध मनुष्यबळ कमी आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१५)

मधील तरतुदीनुसार निवडणुकीस पात्र असणाऱ्या सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका दि.३१/१२/१४ पूर्वी घेणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३ (i) नुसार निवडणुका घेण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पदावर असलेल्या राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची अशा पदनामासह व कर्तव्यांसह राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण नेमणुक करेल अशी तरतुद आहे. तसेच उक्त नियमातील परंतुकान्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण नियम ३(i) चे अधिकार जिल्हा उपनिबंधक पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास वापरण्याचे निर्देश देऊ शकेल. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चा नियम २(८) नुसार उपरोक्त वाचावे क्र.३ अन्वये प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणुन मान्यता दिली आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र.२ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३(i) चे अधिकार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी वापरण्याचे निर्देश दिले आहेत.आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३ (v) नुसार निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा साधारण आदेश किंवा निर्देश देणेचे अधिकार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्राप्त आहे. आणि,

ज्या अर्थी, 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ह्या कायद्यातील तरतुदीनुसार वेळेत पुर्ण होणे आवश्यक असलेने या वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेचेदृष्टीने नियम ३(i) चे अधिकारानुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील 'क' वर्गातील संस्थाचे निवडणुक कामी सहकार खात्या व्यतिरिक्त शासनाचे इतर विभाग, सहकारी संस्थांचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी/ अधिकारी यांची निवडणुक कामकाजासाठी नेमणुक केल्यास उक्त प्रवर्गातील संस्थांच्या निवडणुका या सुरळीत व वेळेत पार पाडल्या जातील असे प्राधिकरणाचे मत झाले आहे,

त्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण नियम ३(v) नुसार पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ३(v) अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या कोणत्याही खात्यातील, स्थानिक स्वराज्य

संस्थांचे अधिकारी किंवा कर्मचारी किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या व्यवस्थापक पदापेक्षा कमी दर्जाचा नाही अशा अधिका-याची पदनामासह व कर्तव्यांसह सहकारी संस्थेच्या निवडणुक कामी नेमणूक करणेत यावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)** 11/12/14
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.